**<u>शपथेवर सरतपास श्री. जयपाल पाटील अधिवक्ता अर्जदारातर्फे :—</u>**

११. आता मला माझे शपथपत्र नि.क्र. यु—०८ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल अध्यक्ष, शासकीय, अर्ध शासकीय सेवकाची पत संस्था मर्या. राजूरा यानी मला दिनांक २८.०५.२०२० रोजी दिलेल्या सेवा निवृत्तीच्या पत्राची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास **नि. यु—११** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मला अध्यक्ष, शासकीय, अर्ध शासकीय सेवकाची पता संस्था मर्या. राजूरा यानी दिनांक ३१.०५.२०२० रोजी दिलेले संस्थेच्या सेवेतून कार्यमुक्त करीत असल्याबाबतच्या आदेशाची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास **नि. यु—१२** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी अध्यक्ष, शासकीय, अर्ध शासकीय सेवकाची पत संस्था मर्या. राजूरा याना दिनांक २३.०६.२०२०, १९.०७.२०२०, १४.०८.२०२०, ३१.०८.२०२०, १५.१०.२०२० व ०३.०२.२०२१ रोजी सेवा निवृत्ती झाल्यामुळे सेवानिवृत्ती लाभ मीळण्याबाबत दिलेल्या पत्राच्या मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेल्या प्रती दाखवील्या, त्यावर माझी सही असून सदर पत्र त्याना मीळाल्याची त्यावर पोच आहे, त्यास अनुक्रमे **नि. यु—१३ ते यु—१८** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल मी गैरअर्जदार याना माझे अधिवक्ता यांचे मार्फत पाठवीलेल्या नोटीसची माझी स्थळ प्रत दाखवीली त्यास नि. **यु—१९** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल मासीक सभेच्या ठरावाची हस्तलिखीत व संगणकीय प्रतीची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास एकत्रीतरीत्या निशाणी **यु—२०** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल गैरअर्जदार संसथेने माझे ०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीत ७ व्या वेतन आयोगातील थकबाकीचे तयार केलेले दिनांक २०.०२.२०१९ चे विवरण पत्र दाखवीले त्यावर माझे नाव नमूद असून त्यावर व्यवस्थापक यांची सही व शिक्का आहे त्यास नि. **यु. २१** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल गैरअर्जदार संस्थेने माझे

दिनांक ०१.०१.२०१९ ते मे २०२० पर्यन्तच्या फरकाच्या तकत्याची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास निशाणी **यु—२२** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल गैरअर्जदार यानी मला दिलेले लाभांश अग्रीम निरंक विवरण पत्राची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास निशाणी **यु—२३** देण्यात येते. आता मला मी प्रकरणात दाखल मी गैरअर्जदार याना दिनांक १४.१२.२०२४ रोजी दिलेल्या अर्जाची मुळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यास एकत्रीतरीत्या निशाणी **यु—२४** देण्यात येते.

प्रकरण उलटतपासा करीता तहकुब

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

स्वा/—

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश

दि. १७.०१.२०२५ कामगार न्यायालय, चंद्रपुर.